अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# बड्या भांडवलदारांना एक लाख कोटींची कर्जमाफी

देशाच्या तिजोरीची लूट देशातले बडे भांडवलदार कसे करतात, यावर आता रिझर्व्ह बँकेनेच शिक्कामोर्तब केले हे बरे झाले. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर यांनी स्वतःच ही माहिती देऊन सरकारची झोप उडवली आणि सामान्य माणसालाही जागे केले आहे. देशातल्या सगळ्या प्रमुख बँकांकडून बड्या भांडवलदारांना आणि उद्योगपतींना भरमसाठ कर्जे दिली जातात. मात्र त्याची वसुली होत नाही आणि ती वसुली करण्याकरता बँकादेखील प्रामाणिकपणे प्रयत्न करत नाहीत, असे चक्रवर्ती यांच्या बोलण्यावरून सिध्द होते. आपला कोणाचाही विश्वास बसणार नाही अशा प्रकारचा कर्जबुडवेपणा मोजक्याच उद्योगपतींनी केला आहे. थोडेथोडके नव्हे तर राष्ट्रीयीकृत बँकांचे तब्बल एक लाख कोटी रुपये या भांडवलदारांनी बुडवले आणि बँकांनीदेखील ते बुडू दिले. आतापर्यंत देशातल्या दहा मोठ्या उद्योगपतींनी देशातल्याच मोठ्या बँकांकडून जवळपास साठ हजार कोटींचे कर्ज घेतले आणि ते या-ना त्या कारणाने फेडण्याची टाळाटाळ केली. कर्जाची थकबाकी वाढत गेली. तर बँकांना आपले व्यवहार करणे त्रासदायक होत जाते. वाढत जाणारा हा एनपीए बँकांच्या प्रतिष्ठेला धक्का लावत असतो. अशावेळी काही ना काही युक्त्या-प्रयुक्त्या करून या बँका वर्षानुवर्षे जे कर्ज वसूल होत नाहीत ते बुडीत टाकण्याचा मार्ग स्वीकारतात. गेल्या तेरा वर्षांमध्ये या पध्दतीने मूठभर भांडवलदारांच्या तिजोरीमध्ये एक लाख कोटींचा पैसा काही न करता जमा झाला, हे आश्चर्यच म्हणावे लागेल. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अलिकडेच अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी कर्ज बुडवणाऱ्या बड्यांविरुध्द कडक कारवाई करण्याचे संकेत दिले होते. पण हे संकेत म्हणजे नुसतीच पोकळ बडबड ठरली आहे. कारण या पैशांच्या वसुलीसाठी नेमके कोणते पाऊल उचलले जाईल हे मात्र त्यांनी सांगितलेले नाही. सत्ताधारी मंडळी आणि भांडवलदार यांचे खूप घनिष्ट संबंध असतात हे अगदी पूर्वीपासून सिध्द झालेले आहे. पंडित नेहरूंच्या काळात मुद्‌गल नावाचे संसद सदस्य होते. त्यांनी असाच व्यापाऱ्यांचा फायदा करून देणारे निर्णय घेतले. त्यांच्यावर हा आरोप झाला. शेवटी पंडित नेहरूंना त्यांच्याविरुध्द चौकशी समिती नेमावी लागली. आणि मुद्‌गल यांचे सदस्यत्व रद्द करण्याची शिफारस करावी लागली होती. एक कोटीची दक्षिणा पाहिल्यावर त्या मुद्‌गल प्रकरणाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.

## शेतकऱ्यांपेक्षा ही कर्जमाफी मोठी

सामान्य माणूस बँकांमध्ये मोठ्या विश्वासाने पैसा जमा करतो आणि त्याच्या पैशावर बडे भांडवलदार मात्र मौजमजा करतात. काही दिवसांपूर्वी सामान्य शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले म्हणून याच उद्योगपतींनी प्रचंड गदारोळ केला होता. भांडवलदारांचे भजन करणाऱ्या अर्थतज्ज्ञांनी सरकारच्या या शेतकरी कर्जमाफीवर बरेच तोंडसुख घेतले होते. साधारण चार वर्षांपूर्वी देशातल्या सगळ्या शेतकऱ्यांचे पासष्ट हजार कोटींचे कर्ज माफ केले गेले. सरकारने मतांकरता ही कर्ज माफी केल्याचा डांगोरा पिटला गेला होता. परंतु, आता बड्या भांडवलदारांना केली गेलेली एक लाख कोटींची कर्जमाफी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीपेक्षा तब्बल पस्तीस हजार कोटींनी जास्त आहे. मग आता इतर राजकीय पक्षांची किंवा तथाकथित अर्थतज्ज्ञांची तोंडे शिवली गेली आहेत का? असा प्रश्न निर्माण होतो. खरे तर आपला देश कृषिप्रधान अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. दुर्दैवाने इथल्या शेतीला कधीही उद्योगाचा दर्जा दिला गेला नाही किंवा तशा सोयी-सुविधाही पुरवल्या गेल्या नाहीत. उलट सरकार आणि व्यापारी या दोघांनीही सामान्य शेतकऱ्याला नागवण्याचेच काम केले. आजही देशाच्या सत्तर टक्के भागांमध्ये शेतीवर उपजिवीका करणारे कोट्यवधी लोक आहेत. त्या शेतीकडे आणि शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करण्याचे पाप सरकारने केले आणि भांडवलदारांच्या पदरामध्ये कर्जमाफीचे भरघोस माप टाकले. या बड्या उद्योगांच्या एक लाख कोटींच्या कर्जमाफीविरोधात देशभरातून आवाज उठला पाहिजे. सामान्य माणसाला जिथे बत्तीस रुपये रोज मिळवता मिळवता नाकीनऊ येते तिथे जर एकेक भांडवलदार बत्तीस हजार कोटींचे कर्ज बुडवत असेल तर त्यांची बत्तिशी काढली पाहिजे.

## ते दहा बडे भांडवलदार कोण?

यातला धक्कादायक भाग असा आहे की, शेतकऱ्यांच्या नावाने राजकारण करणारे, शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन मते मिळवणारे राजकारणी भांडवलदारांचे मात्र गुलाम झालेले दिसतात. कारण इतका मोठा पैसा सरळसरळ भांडवलदारांच्या तिजोरीमध्ये बिनबोभाट जमा होतो. घेतलेली कर्जे काही ना काही कारणे देऊन न फेडण्याचा बहाणा केला जातो. अनेक प्रकरणांमध्ये तर बँकांच्या अध्यक्षांवर किंवा मॅनेजरवर गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतचे राजकारणी दबाव टाकत असतात. कर्ज वसूल होऊ शकत नाही म्हणून मग ते बुडीत टाकण्याचे उपाय सुचवित असतात. राजकीय हस्तक्षेपाशिवाय ही एक लाख कोटींची कर्जमाफी होऊच शकत नाही. राजकारणी सत्ताधारी किंवा भांडवलदार यांच्या लागेबांध्यांमुळे देशाला आज एक लाख कोटीला मुकावे लागले आहे. सर्वाधिक कर्जे घेणारी ही दहा बडी उद्योग घराणी कोणती? यांची नावे जाहीर झाली पाहिजेत. त्यांच्या प्रॉपर्टर्या जप्त झाल्या पाहिजेत. सामान्य माणसाने साधे वीजबिल किंवा फोनबिल भरले नाही तर त्याचे कनेक्शन तोडले जाते. थकबाकीदार म्हणून त्यांची नावे वर्तमानपत्रामध्ये जाहीर केली जातात. मग या बड्या धेंडांना एवढे झुकते माप का दिले गेले? या सगळ्यांची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत आणि जनतनेही ती मिळवली पाहिजेत.